Reg. No.A/587/ANR Dt. 18/07/1963

श्री शनैश्वर देवस्थान
शनि शिंगणापूर

पोस्ट : **सोनई ता.नेवासा जि.अहिल्यानगर** (**महाराष्ट्र**) **फोन** : **०२४२७ -२३८११०**
Email :shanishingnapur@yahoo.com Web Site : www.shanidev.com

कोटेशन सूचना

दि. ०२/११/२०२६

विषय :- सुरक्षा विभागाकरिता अग्निशामक यंत्रे (Fire Extinguishers) रिफिलिंग व दुरुस्तीकामी सीलबंद दरपत्रक मागविण्याबाबत.

श्री शनैश्वर देवस्थान, शिंगणापूर येथील सुरक्षा विभागाकडील खालील नमूद तपशीलानुसार अग्निशामक यंत्रांचे (Fire Extinguishers) रिफिलिंग, सर्व्हिसिंग, आवश्यक स्पेअर्स बदलणे व हायड्रॉलिक टेस्टिंग करणे कामी अधिकृत, अनुभवी व नोंदणीकृत पुरवठादारांकडून सीलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत:

साहित्य तपशील व दरपत्रक तक्ता

अ.क्र.	साहित्य तपशील	रिफिलिंग नग संख्या	दर प्रति नग (सर्व करांसह व वाहतुकीसह) (रु)	एकूण रक्कम (रु)
	ABC Type Dry Powder - ४ kg	४		
	ABC Type Dry Powder - ६ kg	३१		
	CO2- २ kg	१		
	CO2- 4.5 kg	४		
	CO2- 6.5 kg	२		
	Mechanical Foam (AFFF) Type - ९ लिटर	२		
	DCP Type - 5 kg	१		
	DCP Type Trolley Mounted - ५० kg	१		
	Pressure Gauge (बदलून नवीन बसविणे)	१५		
एकूण रक्कम				

Reg. No.A/587/ANR Dt. 18/07/1963

श्री शनैश्वर देवस्थान
शनि शिंगणापूर

पोस्ट : **सोनई ता.नेवासा जि.अहिल्यानगर** (**महाराष्ट्र**) **फोन** : **०२४२७ -२३८११०**
Email :shanishingnapur@yahoo.com Web Site : www.shanidev.com

दरपत्रकाच्या अटी व शर्ती

१. रिफिलिंगसाठी वापरण्यात येणारे रासायनिक पावडर (MAP-based ABC Powder), गॅस अथवा फोम हे BIS / ISI मानकांनुसारच असावेत. रिफिलिंगनंतर प्रत्येक सिलिंडरवर रिफिलिंग तारीख, पुढील एक्सपायरी तारीख, टेस्टिंग प्रेशर आणि एजन्सीचे नाव दर्शविणारे 'स्टिकर/टॅग' व 'होलोग्राम/टॅम्पर प्रूफ सील' लावणे बंधनकारक राहील.

२. नियमानुसार मुदत संपलेल्या सिलिंडर्सचे हायड्रॉलिक प्रेशर टेस्टिंग करून त्याचे अधिकृत हायड्रोटेस्ट प्रमाणपत्र (Hydro-test Certificate) एजन्सीने बिलासोबत सादर करणे अनिवार्य राहील.

३. देवस्थान हा संवेदनशील व गर्दीचा परिसर असल्याने, सर्व सिलिंडर एकाच वेळी नेता येणार नाहीत. टप्प्याटप्प्याने काम करावे लागेल अथवा रिफिलिंग कालावधीदरम्यान आपत्कालीन सुरक्षेसाठी पुरवठादाराने किमान आवश्यक पर्यायी सिलिंडर्स उपलब्ध करून द्यावे लागतील.

४. हे काम अत्यंत तातडीच्या स्वरूपाचे असल्याने, पुरवठा आदेश मिळाल्यापासून ३ ते ५ दिवसांच्या आत रिफिलिंग पूर्ण करून सर्व यंत्रे देवस्थानच्या सुरक्षा विभागास सुपूर्द करावी लागतील.

५. नमूद दरांमध्ये जीएसटी (GST), सिलिंडर देवस्थानमधून नेण्याचा व परत आणण्याचा वाहतूक खर्च (To & Fro Freight), लोडिंग व अनलोडिंग खर्च समाविष्ट असणे आवश्यक आहे. अतिरिक्त कोणताही खर्च देवस्थानतर्फे दिला जाणार नाही.

६.रिफिल केलेल्या साहित्यासाठी रिफिलिंगच्या तारखेपासून किमान १ वर्षाची वॉरंटी/गॅरंटी राहील. या कालावधीत प्रेशर कमी झाल्यास अथवा तांत्रिक दोष आढळल्यास पुरवठादारास स्वखर्चाने त्वरित दुरुस्ती/रिफिलिंग करून द्यावे लागेल.

७. दरपत्रक सादर करताना पुरवठादाराने खालील कागदपत्रांच्या स्वाक्षरी केलेल्या प्रती जोडणे अनिवार्य आहे:

१.दुकान/संस्था नोंदणी प्रमाणपत्र (Shop Act Licence / Udyam).

२.वैध GST नोंदणी दाखला व PAN कार्ड.

३.महाराष्ट्र अग्निशामक सेवा किंवा शासकीय मान्यताप्राप्त एजन्सी असल्याचे प्रमाणपत्र.

८. पुरवठादार यांचे लेटरपॅड वर सदरचे सीलबंद दरपत्रक दि. ०९/११/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत देवस्थानच्या प्रशासकीय कार्यालयातील आवक-जावक विभागाकडे पोहोच करावे. पाकिटावर "सुरक्षा विभागाकरिता Fire Extinguisher रिफिलिंग कामी दरपत्रक" असा स्पष्ट उल्लेख करावा.

९. प्राप्त सीलबंद दरपत्रके दि. ०९/११/२०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता भूसंपादन अधिकारी क्र. १ तथा कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात उपस्थित पुरवठादारांसमक्ष उघडण्यात येतील.

१०. सर्व साहित्याचा योग्य दर्जा व प्रमाणित संख्येनुसार पुरवठा झाल्याची खात्री सुरक्षा विभागाकडून झाल्यानंतर आणि समाधानकारक तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर देयकाची रक्कम बँक खात्यावर (RTGS/NEFT द्वारे) अदा केली जाईल.

११. कोणतेही किंवा सर्व दरपत्रके विनाकारण स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार देवस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. पुरवठादाराने वेळेत किंवा विहित दर्जेदार साहित्य न पुरविल्यास देवस्थान बाजारभावाने हे काम करून घेईल व असा दंड/फरक संबंधित पुरवठादाराकडून वसूल करून त्यांना तीन वर्षासाठी काळ्या यादीत टाकण्यात येईल.

Digitally signed by
ATUL PANDIT CHORMARE
Date: 02-11-2026
15:33:14

श्री अतुल चोरमारे
कार्यकारी अधिकारी
श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्त व्यवस्था शिंगणापूर
विशेष भूसंपादन अधिकारी क्र.१ अहिल्यानगर